## एक अद्‌भुत नाट्याविष्कार; 'ज्ञानोबा माझा' :

मराठी माणूस आणि नाटक यांचे फार जुने नाते आहे. पौराणिक संगीत नाटक असो, विनोदी, फार्सिकल असो किंवा एखाद्या सामाजिक प्रश्नावरील वैचारिक नाटक असो; मराठी रसिक प्रेक्षक नाटक आवर्जून बघणार, त्याची समीक्षा करणार आणि त्याला भरभरून दादही देणार; हे अगदी ठरून गेलेले समीकरण आहे.

हे येथे सांगायचे कारण असे की, रंगभूमीच्या सध्याच्या ट्रेन्डमध्ये न बसणारे, तरीही प्रेक्षकांच्या मनाची जबरदस्त पकड घेणारे **'ज्ञानोबा माझा'** हे नाटक सध्या महाराष्ट्रभर गाजत आहे. 'श्रीवामनराज'च्या मागच्या अंकात आपण वाचलेच होते की, प.पू.सद्‌गुरु श्री.मामांनी लिहिलेले **'चैतन्यचक्रवर्ती'** हे श्रीज्ञानेश्वर माउलींच्या जीवनावरील चार अंकी नाटक ही या नाटकाची मूळ संहिता.

गेल्या कित्येक वर्षांत, मराठी रंगभूमीवर संतचरित्रावरील नाटक झालेले नाही. या पार्श्वभूमीवर, नाटकाची अत्यंत सूक्ष्म, तरल जाण असणाऱ्या प.पू.श्री.मामांसारख्या प्रतिभासंपन्न श्रीमाउलीभक्ताची, श्रीमाउलींच्या जीवनावरील मूळचीच ताकदवान संहिता, श्री.अशोक समेळांचे प्रभावी दिग्दर्शन, डॉ.विद्याधर ओकांसारख्या व्यासंगी संगीतकाराचे श्रवणमधुर संगीत, श्री.राहुल देशपांडे आणि श्री.अमोल बावडेकर यांच्यासारख्या कसलेल्या गायकांचे पार्श्वगायन या सर्वांचा अपूर्व संगम असलेले **'ज्ञानोबा माझा'** हे नाटक पाहणे हा एक लखलखीत, झळझळीत, बावनकशी अनुभव आहे हे नक्की !

कु.वेदश्री आगाशे (ज्ञानदेव), श्री.आश्विन धाक्रस (निवृत्तिनाथ), कु.अंकुर देशमुख (सोपान), कु.रसिका जोग (मुक्ता) आदी भावंडांसह सर्वच सहकलाकारांनी आपापल्या भूमिका अतिशय ताकदीने पेलल्या आहेत.

पूर्वरंग आणि शुभारंभाच्या वेळी, मुंबईत नाट्यक्षेत्रातील दिग्गजांच्या पसंतीची पावती मिळालेले हे नाटक, आता समस्त मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनावरच अधिराज्य गाजवत आहे. मुंबईतील ठाणे, माटुंगा, बोरिवली, पार्ले,



कल्याण, वाशी; त्यानंतर कऱ्हाड, सातारा, पुणे असे महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी यशस्वी दौरे करणाऱ्या या **'ज्ञानोबा माझा'**च्या चमूला नाशिक, विदर्भ, भिलाई (मध्यप्रदेश), गोवा अशा अनेक ठिकाणांहून प्रयोगांसाठी हार्दिक आमंत्रणेही आलेली आहेत. ठाणे जनता सहकारी बँकेने तर त्यांच्या विविध शाखांतील ग्राहकांसाठी, मुंबई व पुणे येथे मिळून चार प्रयोग संपूर्ण बुक केले होते ! हाही या नाटकाचा एक वेगळा विक्रमच म्हटला पाहिजे.

नाटक बघणाऱ्यांचे अनुभव आणि अभिप्रायही लक्षणीय आहेत. नाटक बघताना साधकेतर प्रेक्षकांनाही आपले अश्रू आवरता आले नाहीत. कित्येकजण तर माउलींच्या पाया पडायला धावले. स्टेजवरच्या श्रीभगवंतांच्या आणि श्रीमाउलींच्या जयजयकारात प्रेक्षागृहातून येणारा उत्स्फूर्त जयजयकार मिसळून जात होता. अनेकजण उभे राहून श्रीमाउलींना अभिवादन करीत होते, त्यांना फुले अर्पण करीत होते. नाटक संपल्यानंतर, कलाकारांना पसंतीची शाबासकी देण्यासाठी सर्वच ठिकाणी मोठी गर्दी लोटत असते. 'पुनःपुन्हा बघावे असे अतिशय सुंदर नाटक', 'गेल्या कित्येक वर्षांत बघितले नाही एवढे उत्तम नाटक', 'साक्षात् श्रीमाउलींच्या काळात घेऊन जाणारे, आपल्याला त्यांची साक्षात् दिव्य अनुभूती देणारे रसरशीत नाटक' अशा अर्थांचे असंख्य अभिप्राय प्रेक्षकांनी नाटक बघितल्यावर दिलेले आहेत.

नाटकाचे आजपर्यंत झालेले सर्वच्या सर्व प्रयोग 'हाऊसफुल्ल' झालेले आहेत, हे वेगळे सांगायला नकोच !

प.पू.सद्‌गुरु सौ.ताई आणि प.पू.सद्‌गुरु श्री.दादांच्या प्रेमळ मार्गदर्शन व आशीर्वादांच्या योगेच हे नाटक आपण यशस्वी करू शकलो, अशीच या नाट्यचमूची यथार्थ धारणा आहे. भगवान श्रीज्ञानेश्वर महाराज आणि प.पू.सद्‌गुरु श्री.मामांच्या अपार करुणामयी कृपासामर्थ्याचा उत्कट प्रत्यय देणारे हे नाटक पाहणे, हा म्हणूनच एक सर्वांगसुंदर अद्‌भुत मनोहर अनुभव आहे.

□□